(19)

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

(महाराष्ट्र शासनाने वर्षे 1989 मध्ये स्थापिलेले)

ज्ञानगंगा घरोघरी

## व्यवस्थापन मंडळ बैठक

# कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| बैठक क्रमांक | : | 167 |
| स्थळ | : | प्रशासकीय इमारत<br>यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ<br>नाशिक, 422 222 |
| वार व दिनांक | : | गुरूवार , दिनांक : 11 ऑक्टोबर 2018 |
| वेळ | : | सकाळी 11.30 वाजता |

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**(महाराष्ट्र शासनाने वर्षे 1989 मध्ये स्थापिलेले)**

---

## 167 वी, व्यवस्थापन मंडळ बैठक कार्यवृत्त

167 वी, व्यवस्थापन मंडळ बैठक, गुरूवार, दिनांक 11 ऑक्टोबर 2018 रोजी सकाळी 11.30 वाजता, प्रशासकीय इमारत येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

| | |
|---|---|
| 1. मा प्रा.ई वायुनंदन, कुलगुरु, | अध्यक्ष |
| 2.मा.डॉ. दिलीप म्हैसेकर, कुलगुरू | सदस्य |
| 3. मा.प्रा. कपिलकुमार, नवी दिल्ली | सदस्य |
| 4. मा.आमदार श्री.बाळासाहेब सानप,नाशिक | सदस्य |
| 5. मा.आमदार श्रीमती देवयानी फरांदे | सदस्य |
| 6. मा. डॉ. अनिल कुलकर्णी, पुणे | सदस्य |
| 7. मा.श्री. हेमंत आंबासेलकर, नागपूर | सदस्य |
| 8.मा.डॉ.सचिन मांडवगणे, नागपूर | सदस्य |
| 9.डॉ. दिनेश भोंडे, कुलसचिव | सचिव |
| 10.प्रभारी वित्त अधिकारी, य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक | निमंत्रित |
| **खालील सदस्यांची अनुपस्थिती मान्य करण्यात आली.** | |
| 11.मा. सचिव,उच्च व तंत्रशिक्षण,मुंबई | सदस्य |
| 12.मा. सचिव, उद्योग, मुंबई | सदस्य |
| 13. मा. सचिव, कृषी, मुंबई | सदस्य |
| 14.मा.संचालक, उच्च शिक्षण,पुणे | सदस्य |
| 15.मा.संचालक,व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण | सदस्य |
| 16.मा.संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई | सदस्य |
| 17.मा.डॉ.आशिष पातुरकर, कुलगुरू,नागपूर | सदस्य |

| ठराव क्र. | | तपशील |
|---|---|---|
| 167.1.0 | 167.1.1 | **स्वागत** — मा.कुलसचिव यांनी मा.अध्यक्ष व उपस्थित सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले त्यानंतर मा.कुलगुरूंनी व्यवस्थापन मंडळावर मा.कुलपती यांच्याकडून नव्याने नियुक्त झालेल्या खालील सदस्यांचे विद्यापीठाची शाल, पुष्पगुच्छ व पुस्तक देऊन स्वागत केले<br>(1) मा.डॉ. दिलीप म्हैसेकर, कुलगुरू,नाशिक<br>(2) मा. डॉ. अनिल कुलकर्णी, पुणे<br>(3) मा.श्री. हेमंत आंबासेलकर, नागपूर<br>(4) मा.डॉ.सचिन मांडवगणे, नागपूर<br>**मा.कुलगुरू यांनी खालील बाबींचा उल्लेख केला —**<br>01. विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्याकडून विद्यापीठास 32 शिक्षणक्रमांस (सन 2018-19 ते 2022-23) मान्यता प्राप्त झाल्याचे विशद केले.<br>02. दि. 14 सप्टेंबर 2018 रोजी विद्यापीठामध्ये, श्री. सौरभ विजय, सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन,मुंबई यांच्याशी विद्यापीठातील विविध शिक्षणक्रम व विद्यापीठास येणा-या अडचणींबाबत चर्चा केली. |

| | | |
|---|---|---|
| | | 03. सन 2018-19 या शैक्षणिक वर्षासाठी आजपर्यंत विद्यापीठास मान्य करण्यात आलेल्या विविध शिक्षणक्रमांसाठी एकूण 5,70,321 विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असल्याचे विशद केले.<br>04. दि. 7 ते 11 डिसेंबर 2018 या कालावधीत विद्यापीठ प्रांगणात राज्यस्तरीय आंतरविद्यापीठ युवकमहोत्सवाचे (इंद्रधनुष्य) आयोजन करण्यात येत आहे.<br>05. विद्यापीठातून निवृत्त झालेल्या अधिकारी व कर्मचा-यांना शासनाकडून निवृत्तीवेतन मिळण्यास अनेक अडचणी येत असल्याचे विशद केले.<br>06. विद्यापीठातील शिक्षकांच्या Career Advance Scheme (CAS)ची वेतन निश्चिती अनेक दिवसांपासून सहसंचालक कार्यालय, उच्च शिक्षण,पुणे येथे प्रलंबित असल्याचे विशद केले. |
| 167.2.0 | 167.2.1 | दि. 24 मार्च 2018 रोजी झालेल्या 165 व्या व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीचे कार्यवृत्त वाचून कायम करणे<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव: दि. 24 मार्च 2018 रोजी झालेल्या 165 व्या व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून सर्वानुमते कायम करण्यात आला.** |
| | 167.2.2 | दि. 26 मार्च 2018 रोजी झालेल्या 166 व्या व्यवस्थापन मंडळ व विद्वत परिषद एकत्रित बैठकीचे कायम करणे<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव: दि. 26 मार्च 2018 रोजी झालेल्या 166 व्या व्यवस्थापन मंडळ व विद्वत परिषद एकत्रित बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून सर्वानुमते कायम करण्यात आला.** |
| | 167.2.3 | दि. 24 मार्च 2018 रोजी झालेल्या 165 व्या व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीतील झालेल्या निर्णयावरील कार्यवाहीचा अहवाल<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव: दि. 24 मार्च 2018 रोजी झालेल्या 165 व्या व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत झालेल्या निर्णयावरील कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.** |
| | 167.2.4 | दि. 26 मार्च 2018 रोजी झालेल्या 166 व्या व्यवस्थापन मंडळ व विद्वत परिषद एकत्रित बैठकीतील झालेल्या निर्णयावरील कार्यवाहीचा अहवाल<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव: दि. 26 मार्च 2018 रोजी झालेल्या 166व्या व्यवस्थापन मंडळ व विद्वत परिषद एकत्रित बैठकीत झालेल्या निर्णयावरील कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.** |
| 167.3.0 | | **कार्योत्तर मान्यतेचे विषय** |
| | 167.3.1<br>विधी | श्री. मुरलीधर लिंबाजी मापारी यांची बी.एड.शिक्षणक्रमाच्या प्रवेशाबाबत मा. उच्च न्यायालय,मुंबई (औरंगाबाद खंडपीठ) याच्या परीक्षा मंडळाच्या ठरावावर मा.कुलगुरू यांनी केलेली कार्यवाही व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेसाठी सादर<br>**टिप्पणी** – दि. 24 मार्च 2018 च्या व्यवस्थापन मंडळ ठराव क्र. 165.3.6 नुसार श्री. मुरलीधर लिंबाजी मापारी यांची बी.एड.शिक्षणक्रमाच्या प्रवेशाबाबत मा. उच्च न्यायालय,मुंबई (औरंगाबाद खंडपीठ)याच्याआदेशानुसार विद्यापीठाने स्थापन केलेल्या चौकशी समिती अहवाल विद्यापीठाच्या परीक्षा मंडळापुढे ठेवण्यात येऊन याबाबत योग्य तो निर्णय घेऊन सदरील विषय पुढील व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीस ठेवावा.त्यानुसार परीक्षामंडळाचा निर्णयावर मा.कुलगुरूंयांनी केलेली कार्यवाही व्यवस्थापन मंडळाच्या कार्योत्तर मान्यतेसाठी सादर<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव- श्री.मुरलीधर लिंबाजी मापारी यांची बी.एड.शिक्षणक्रमाच्या प्रवेशाबाबत मा. उच्च न्यायालय,मुंबई (औरंगाबाद खंडपीठ) यांच्या, विद्यापीठाच्या दि. 25 जुलै 2018 च्या परीक्षा मंडळ ठराव क्र. 34.4.02 नुसार, श्री.मापारी यांनी शिक्षण अधिकारी, परभणी यांचे मान्यताप्राप्त** |

| | | |
|---|---|---|
| | | **पत्र सादर करू न शकल्याने, वर्ष 1996-98 बी.एड.अभ्यासक्रमाच्या प्रवेशास अपात्र ठरले. विद्यापीठाने दिलेल्या बी.एड.च्या पदवीस ते अपात्र ठरल्यामुळे श्री.मापारी यांना देण्यात आलेली बी.एड.शिक्षणक्रमाची पदवी काढून घेण्यात येत आहे. याबाबत मा.कुलगुरू यांनी केलेल्या कार्यवाहीला सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |
| | 167.3.2<br>विधी | विद्यापीठाने खालील संस्थांशी करार(MoU)केलेले आहेत,सदरील बाब कार्यात्तर मान्यतेसाठी सादर<br>**टिप्पणी** - 1) अभिनव इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड मॅनेजमेंट , ठाणे या संस्थेशी<br>1) Diploma in Essential Skills 2) Diploma in Bussiness Skills 3) Diploma in Industrial Skill हे शिक्षणक्रम राबविण्याबाबत केलेला करार (MoU) |
| | | 2) उपअध्यक्ष, राजयोग शिक्षण आणि संशोधन (RE & RF)माऊंट अबू यांचेशी खालील शिक्षणक्रम राबविण्याबाबत केलेला करार (MoU) व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेसाठी सादर<br>(1) Preparatory Programme (6 months)<br>(2) Diploma in Valuess & Spiritual Education (1 years)<br>(3) Advance Diploma in Valuess & Spiritual Education (2 years)<br>(4) B.A. in Values & Spiritual Education (3 years)<br>(5) M.A. in Yoga, Values Education & Spirituality (2 years)<br>(6) Post Graduate in Counselling & Spiritual Health (1 year)<br>(7) Any Other certificate/ Diploma (1 yr)/Advance Diploma (2 yr) / Graduate(3yrs)/ Post graduate Diploma (1yr)/ Post graduate Diploma (2yr) programme mutually developed)<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव: विद्यापीठाने (1) अभिनव इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड मॅनेजमेंट , ठाणे (2) उपअध्यक्ष, राजयोग शिक्षण आणि संशोधन (RE & RF)माऊंट अबू यांचेशी टिप्पणीत उल्लेख केलेले शिक्षणक्रम राबविण्याबाबत करण्यात आलेल्या सामंजस्य कराराबाबत (MoU) मा.कुलगुरू यांनी केलेल्या कार्यवाहीला सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |
| | **167.3.3<br>वि.स.<br>12.3.1** | **वि.स. 12.3.1** — व्यवस्थापन मंडळाने एप्रिल ते जून 2018 च्या जमा खर्चासाठी लेखा अनुदानास मंजुरी दिलेली होती.त्यापुढील दोन महिन्यांचा (जुलै व ऑगस्ट) दैनंदिन जमा-खर्च भागविण्यासाठी वाढीव अंदाजे 30 कोटी लेखा अनुदानास कार्योत्तर मंजुरीस्तव<br>**टिप्पणी-** जुलै व ऑगस्ट 2018 दैनंदिन जमा-खर्च भागविण्यासाठी वाढीव अंदाजे 30 कोटी लेखा अनुदानास कार्योत्तर मंजुरीस्तव<br>**वि.स.ठराव**—नोंद घेण्यात आली. सदरची बाब व्यवस्थापन मंडळाच्या कार्यात्तर मंजुरीस्तव सादर<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव - वित्त समितीने केलेल्या ठराव क्र.12.3.1 नुसार जुलै ते ऑगस्ट 2018 च्या दैनंदिन जमा खर्च भागविण्यासाठी वाढीव अंदाजे 30 कोटी लेखा अनुदानास मा.कुलगुरू यांनी केलेल्या कार्यवाहीला सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |
| 167.4.0 | | **सखोल चर्चेचे विषय** |
| | 167.4.1 | दि. 6 सप्टेंबर 2018 रोजी झालेल्या वित्त समिती बैठकीतील शिफारशी व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेसाठी सादर |
| | 01. | **वि.स. 12.4.1** — सन 2017-18 चे सुधारित व सन 2018-19 चे अंदाजपत्रक चर्चा होऊन मंजुरीस्तव सादर<br>**टिप्पणी-** वित्तसमितीच्या ठराव क्र. 12.4.1.दि.13.3.2018 नुसार अंदाजपत्रकावर चर्चा होऊन वित्त विभागाने अंदाजपत्रक तयार करून ते वित्त समितीच्या उपसमितीसमोर सादर करावे. |

उपसमितीने ते तपासून वित्त समितीसमोर सादर करावे असा निर्णय झालेला होता.
वरीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली असून त्याचा तपशील खालीलप्रमाणे –
वित्तसमितीच्या मार्गदर्शनानुसार सन 2017-18 चे सुधारित व सन 2018-19 चे अंदाजपत्रक तयार करून वित्त समितीच्या खालील उपसमितीसमोर सादर करून उपसमितीने केलेल्या सूचनांनुसार अंदाजपत्रक सुधारित करण्यात आले.
वित्त समितीच्या आदेशानुसार खालील बदल करून अंदाजपत्रक सादर करीत आहोत.

1) अंदाजपत्रकात 2016-17 चे Actual Receipts **व** Payments चा समावेश करण्यात आलेला आहे.
2) Actual व Estimated Receipts Payments याचा ताळमेळ करण्यात आलेला आहे.
3) अंदाजपत्रकातील Fees तपशीलानुसार दर्शविण्यात आलेल्या आहेत.
4) Revised Estimate आवश्यकतेनुसार करण्यात आले.
5) अंदाजपत्रकात Deficit दिसतो.तथापी खर्चात कपात /बचत करून ताळेबंदानुसार राहीलेला Surpus फंडामध्ये वर्षाअखेरीस वर्ग करण्यात येईल.
6) Grants साठी संबंधीत विभागांकडून अनुदान देणा-या संस्थांकडे / शासनाकडे पाठपुरावा केल्याबाबतची माहिती सादर करण्यात येत आहे.
7) Post Matric Scholarship ची माहिती सादर करण्यात येत आहे.
8) मागील वर्षापेक्षा जास्तीचा / कमी खर्च तपासून Recise बजेट करण्यात आलेले आहे.
9) Study Centre Remneration ऐवजी Study Centre Fees Refundअसे लेखाशीर्ष करण्यात आले आहे.
10) Headwise break-up करण्यात आला.
11) Salary ही प्रत्येक विभागाची तपशीलवार करण्यात आली आहे.

तसेच या समितीने अंदाजपत्रकातील लेखाशीर्षाचे संगणकीय कोडचा आणि वर्गीकरण्यानुसार नवीन कोडनंबर देण्यात आले व त्यानुसार नवीन पध्दतीने अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. संगणकीय आज्ञावलीतही त्याप्रमाणे बदल करण्यात येत आहे.

**वि.स.ठराव** – अंदाजपत्रकावर चर्चा करण्यात आली. संदर्भात मा.डॉ.संजय खडक्कार यांनी असे सुचविले की, विद्यापीठाच्या मुख्यालय तसेच विभागीय केंद्रासाठी जागा घेण्यात याव्यात व त्यासाठी एक समिती नेमण्यात यावी. आवश्यकतेनुसार गरज भासल्यास अंदाजपत्रकात यासाठी अधिक निधीची तरतूद करण्यात यावी. तसेच **Part A** ला **Non Plan** ऐवजी **Maintenance /Recurring Part**म्हणावा तसेच विद्यापीठाच्या विकासात्मक कामांसाठी **Development** चे स्वतंत्र लेखाशीर्ष दर्शविण्यात यावे. यासूचनांसह अंदाजपत्रक व्यवस्थापन मंडळाच्या मजुरीस्तव शिफारशीसह सादर

**व्यवस्थापन मंडळ ठराव – सन** 2017-18 **चे सुधारित व सन** 2018-19 **च्या अंदाजपत्रकावर सविस्तर चर्चा करण्यात आली. वित्तसमितीने केलेल्या शिफारशीनुसार**

**(1) विद्यापीठ मुख्यालय तसेच विभागीय केंद्रासाठी जागा घेण्याबाबत समिती नेमण्याचे सुचविण्यात आले,सदरच्या समितीत सदस्य निवडीचे अधिकार मा.कुलगुरू यांना प्रदान करण्यात आले.**

**(2) व्यवस्थापन मंडळ सदस्य डॉ.अनिल कुलकर्णी यांनी सन** 2018-19 **या अंदाजपत्रकासाठी "Budget Monitoring Committee" ची स्थापना करण्यात यावी. दर तीन महिन्यांनी जमा व खर्चाचा आढावा सदरील समितीने घ्यावा असे सुचविले.समिती सदस्य नेमण्याचे अधिकार मा.कुलगुरू यांनी प्रदान करण्यात आले.**

**(3) Part A ला Non Plan ऐवजी Maintenance /Recurring Part असे**

| | | |
|---|---|---|
| | | **संबोधावे तसेच विद्यापीठाच्या विकासात्मक कामांसाठी** Development **चे स्वतंत्र लेखाशीर्षक दर्शविण्यात यावे.**<br>**या सुचनांसह सर्वानुमते सन** 2017-18 **चे सुधारित व सन** 2018-19 **च्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली.** |
| | 02 | **वि.स.** 12.4.5 — भांडार व जावक कक्षातील कालबाह्य शिक्षणसाहित्याचा शिल्लक साठा रद्दी विक्रीद्वारे निर्लेखन करण्याची बाब विचारार्थ<br>**टिप्पणी** - भांडार व जावक कक्षातील कालबाह्य शिक्षणसाहित्याचा शिल्लक साठा रद्दी विक्रीद्वारे निर्लेखन करण्यास मंजुरी मिळणेबाबत<br>**वि.स.ठराव** —भांडार व जावक कक्षातील कालबाह्य शिक्षणसाहित्याचा शिल्लक साठा रद्दी विक्रीद्वारे निर्लेखन करण्यास व्यवस्थापन मंडळाच्या मंजुरीस्तव शिफारशींसह सादर<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव - वित्तसमितीने केलेल्या शिफारशीनुसार भांडार व जावक कक्षातील कालबाह्य शिक्षणसाहित्याचा शिल्लक साठा रद्दी विक्रीद्वारे निर्लेखन करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |
| | 03 | **वि.स.** 12.4.6 — विद्यापीठ व कृषी विज्ञान केंद्रातील शिक्षक, अधिकारी व शिक्षकेतर कर्मचारी यांना दि. 2 मे 2013 च्या शासन निर्णयानुसार शासकीय कामकाजास्तव हॉटेल वास्तव्यासाठी देय असलेल्या दैनिक भत्ता सुधारित दराने देण्याची बाब विचारार्थ<br>**टिप्पणी** - विद्यापीठ व कृषी विज्ञान केंद्रातील शिक्षक, अधिकारी व शिक्षकेतर कर्मचारी यांना दि. 2 मे 2013 च्या शासन निर्णयानुसार शासकीय कामकाजास्तव हॉटेल वास्तव्यासाठी देय असलेल्या दैनिक भत्त्यांच्या सुधारित दरानुसार देण्यास मंजुरी मिळणेबाबत<br>**वि.स.ठराव** - दि. 2 मे 2013 च्या महाराष्ट्र शासन निर्णयानुसार शासकीय कामकाजास्तव हॉटेल वास्तव्यासाठी देय असलेल्या दैनिक भत्त्यांच्या सुधारित दरानुसार मान्यता देण्यास व्यवस्थापन मंडळाच्या मंजुरीस्तव शिफारशींसह सादर<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव - वित्तसमितीने केलेल्या शिफारशीनुसार विद्यापीठ व कृषी विज्ञान केंद्रातील शिक्षक, अधिकारी व शिक्षकेतर कर्मचारी यांना यापुढे महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले प्रवास, दैनिक व निवास व्यवस्थेबाबतचे दर स्विकारण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |
| | 04 | **वि.स.** 12.4.7 —विद्यापीठ कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान देण्याची बाब विचारार्थ<br>**टिप्पणी** — विद्यापीठ कर्मचा-यांना गेल्या अनेक वर्षापासून सानुग्रह अनुदान देत आहे. सन 2017साठी रु. 25,000/-सानुग्रह अनुदान देण्यात आलेले आहे. त्याचा तक्ता पुढीलप्रमाणे<br>**कर्मचारी वर्ग** — **सन** 2017<br>1) नियमित — रु. 25,000/-<br>2) करारावरील कर्मचारी — रु. 18,750/-<br>3) सफाई,सुरक्षा व इतर — रु. 1,950/-<br>त्यानुसार सन 2018 या वित्तीय वर्षात 1 एप्रिल ते 31 मार्च या कालावधीत किमान सहा महिने किंवा त्यापेक्षा अधिक कालावधीसाठी कार्यरत असणा-या विद्यापीठातील नियमित कर्मचारी, करारावरील कर्मचारी व सफाई, सुरक्षा व इतर यांना सानुग्रह अनुदान अदा करण्याबाबत व्यवस्थापन मंडळास शिफारस करण्याकरिता विचारार्थ सादर<br>**वि.स.ठराव** - सन 2017- 18 या वित्तीय वर्षात 1 एप्रिल ते 31 मार्च या कालावधीत किमान सहा महिने किंवा त्यापेक्षा अधिक कालावधीसाठी कार्यरत असणा-या विद्यापीठातील नियमित कर्मचारी, करारावरील कर्मचारी व सफाई, सुरक्षा व इतर यांना सानुग्रह अनुदान अदा करण्याबाबत व्यवस्थापन मंडळाच्या मंजुरीस्तव शिफारशींसह सादर<br>1) नियमित — रु. 30,000/-<br>2) करारावरील कर्मचारी — रु. 22,000/- |

| | | |
|---|---|---|
| | | 3) सफाई,सुरक्षा व इतर रु. 5,000/-<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव - वित्तसमितीने केलेल्या शिफारशीनुसार सन** 2017- 18 **या वित्तीय वर्षात** 1 **एप्रिल ते** 31 **मार्च या कालावधीत किमान सहा महिने किंवा त्यापेक्षा अधिक कालावधीसाठी कार्यरत असणा-या विद्यापीठातील नियमित कर्मचारी, करारावरील कर्मचारी व सफाई, सुरक्षा व इतर यांना खालीलप्रमाणे**<br>1) **नियमित** **रु.** 30,000/-<br>2) **करारावरील कर्मचारी** **रु.** 22,000/-<br>3) **सफाई,सुरक्षा व इतर** **रु.** 5,000/-<br>**सानुग्रह अनुदान देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |
| | 05 | **वि.स.** 12.5.2–MOOC(Commercial Fruit Production)Pomegranate & Guava हा Onlineशिक्षणक्रमासाठी वर्ष 2018-19 या अंदाजपत्रकात आर्थिक तरतूद करण्याची बाब विचारार्थ<br>**टिप्पणी** – MOOC – Commercial Fruit Production – Pomegranate & Guava हा Online शिक्षणक्रम विकसित करण्यासंदर्भात **IUC, IGNOU – SWAYAM,** नवी दिल्ली यांचेकडे अनुदान प्रस्ताव पाठविण्यात आला होता. सदर प्रस्ताव मान्य होऊन त्यासाठी रु. 13.5लाख इतका निधी मंजुर झाल्याबाबतचे पत्र प्राप्त झाले आहे. उपरोक्त शिक्षणक्रम विकसनासाठी प्राप्त होणा-या अनुदानासाठी नवीन लेखाशीर्ष MOOC Grant साठी रु.13.5लक्ष करावयाच्या आर्थिक तरतूदीसंदर्भातील प्रस्ताव मंजुरीस्तव सादर<br>**वि.स.ठराव** - MOOC – Commercial Fruit Production – Pomegranate & Guava हा Online शिक्षणक्रम विकसित करण्यासाठी अंदाजपत्रकात नवीन लेखाशीर्ष MOOC Grant निर्माण करण्यास त्यात रु.13.5लक्ष तरतूद करण्यासाठी व्यवस्थापन मंडळाच्या मंजुरीस्तव शिफारशीसह सादर<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव - वित्तसमितीने केलेल्या शिफारशीनुसार** MOOC(Commercial Fruit Production – Pomegranate & Guava **हा** Online **शिक्षणक्रम विकसित करण्यास, तसेच** 2018-19 **अंदाजपत्रकात नवीन लेखाशीर्ष** MOOC Grant **निर्माण करण्यास, त्यासाठी रु.**13.5 **लक्ष तरतूद करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |
| | 06 | **वि.स.** 12.5.3 –एम.बी.ए.शिक्षणक्रम अहवाल तपासणी व सहकार व्यवस्थापन शिक्षणक्रमाच्या स्थिती अहवाल तपासणीचे सुधारित मानधन दर मंजुर करणेची बाब विचारार्थ<br>**टिप्पणी** – वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेमार्फत एम.बी.ए. शिक्षणक्रम अहवाल तपासणी व सहकार व्यवस्थापन शिक्षणक्रमाच्या स्थिती अहवाल तपासणीचे सुधारीत मानधन दर खालीलप्रमाणे प्रस्तावित केलेले आहेत ते दर मंजुरीस्तव सादर<br>1) सहकार व्यवस्थापन शिक्षणक्रम स्थिती अहवाल रु.25/- वरुन रु.150/-<br>2) एम.बी.ए.शिक्षणक्रम अहवाल तपासणीसाठी अंतर्गत पर्यवेक्षक रु.300/- वरुन रु.500/- बहिस्थ पर्यवेक्षक रु.300/- वरुन रु.500/- तसेच आराखडा तपासणी रु.25/- वरुन रु.100/-<br>3) वरील कामांसाठी विद्याशाखेतील सहायक यांना डीटीपी व इतर संलग्न कामासाठी प्रति विद्यार्थी रु.25/- प्रमाणे मानधन देणेबाबतही प्रस्तावित करण्यात आले आहे.<br>**वि.स.ठराव** - सहकार व्यवस्थापन शिक्षणक्रम स्थिती अहवाल व एम.बी.ए.शिक्षणक्रम अहवाल तपासणीसाठी अंतर्गत पर्यवेक्षक व बहिस्थ पर्यवेक्षक तपासणी कामी इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाच्या दराप्रमाणेच दर मंजुरीस मान्यसेस्तव व्यवस्थापन मंडळाच्या मंजुरीस्तव शिफारशीसह सादर<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव - वित्तसमितीने केलेल्या शिफारशीनुसार सहकार व्यवस्थापन शिक्षणक्रम स्थिती अहवाल व एम.बी.ए.शिक्षणक्रम अहवाल** |

| | | |
|---|---|---|
| | | **तपासणीसाठी अंतर्गत पर्यवेक्षक व बहिस्थ पर्यवेक्षक तपासणी कामी इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाचे दि. . 15 डिसेंबर 2017 च्या अधिसूचनेनुसार देण्यात आलेले दर लागू करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |
| | 07 | **वि.स. 12.5.4** –अनुदेशन संपादन मानधनास मंजुरी मिळणेची बाब विचारार्थ<br>**टिप्पणी** – एम.ए.शिक्षणक्रमाच्या विकसनात लेखक, संपादक म्हणून सहकार्य केलेल्या तज्ज्ञ प्राध्यापकांकडून अनुदेशन संपादन करून घेण्यास व त्यासाठी त्यांनी रु. 2,000/- प्रति पुस्तक मानधन देणेबाबतचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर<br>**वि.स.ठराव** - अनुदेशन संपादन मानधनास इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाच्या दराप्रमाणेच दर मंजुरीस मान्यसेस्तव व्यवस्थापन मंडळाच्या मंजुरीस्तव शिफारशीसह सादर<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव - वित्तसमितीने केलेल्या शिफारशीनुसार अनुदेशन संपादन मानधनास इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाच्या दि. 15 डिसेंबर 2017 च्या अधिसूचनेनुसार देण्यात आलेले दर लागू करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |
| | 08 | **वि.स. 12.5.5** –शिक्षणक्रम विकसन, विद्यार्थी मूल्यमापन आदि विषयी प्रस्तावित मानधन देण्याची बाब विचारार्थ<br>**टिप्पणी** – संचालक, मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा यांनी शिक्षणक्रम विकसन कार्यातील अध्ययन साहित्य विकसन आणि विद्यार्थी पूरकसेवा तसेच पुस्तक छपाई व मूल्यमापन संदर्भातील वाढीव मानधानाचा प्रस्ताव इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाने स्वीकृत केलेल्या दरांप्रमाणेच सादर केलेला आहे. सदर प्रस्तावानुसार प्रस्तावित मानधन देणेबाबत मंजुरीस्तव सादर<br>**वि.स.ठराव** - शिक्षणक्रम विकसन कार्यातील अध्ययन साहित्य विकसन आणि विद्यार्थी पूरकसेवा तसेच पुस्तक छपाई व मूल्यमापन संदर्भातील इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाने स्वीकृत केलेल्या दरांप्रमाणेच मानधन देणेबाबत व्यवस्थापन मंडळाच्या मंजुरीस्तव शिफारशीसह सादर<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव - वित्तसमितीने केलेल्या शिफारशीनुसार शिक्षणक्रम विकसन कार्यातील अध्ययन साहित्य विकसन आणि विद्यार्थी पूरकसेवा तसेच पुस्तक छपाई व मूल्यमापन संदर्भातील इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाने दि. 15 डिसेंबर 2017 च्या अधिसूचनेनुसार देण्यात आलेले दर लागू करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |
| | 09 | **वि.स. 12.5.6** –पीएच.डी.शिक्षणक्रम विद्यार्थ्यांना मुदतवाढ देण्याची बाब विचारार्थ<br>**टिप्पणी** - विद्यापीठाच्या विविध विद्याशाखांमध्ये पीएच.डी.चे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्यांची मुदत सप्टेंबर 2018 मध्ये संपत आहे. सध्या या विद्यार्थ्यांचे रिसर्च वर्क सुरु असून ते डेटा अँनालिसिसचे काम करीत आहेत. त्यांना एक वर्ष मुदतवाढ मंजुरीस्तव सादर<br>**वि.स.ठराव** - पीएच.डी. विद्यार्थ्यांना दि. 1ऑक्टोबर 2018 ते दि.30 सप्टेंबर 2019 पर्यंत एक वर्ष मुदतवाढ देण्यास व्यवस्थापन मंडळाच्या मंजुरीस्तव शिफारशीसह सादर<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव - वित्तसमितीने केलेल्या शिफारशीनुसार पीएच.डी. विद्यार्थ्यांना दि. 1ऑक्टोबर 2018 ते दि.30 सप्टेंबर 2019 पर्यंत एक वर्ष मुदतवाढ देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |
| | 10 | **वि.स. 12.5.7**–अभ्यासकेंद्र पहाणी समिती सदस्यांना रु. 1000/-प्रतिदिन मानधन देण्याची बाब<br>**टिप्पणी** - अभ्यासकेंद्र पहाणी समिती सदस्यांना शिक्षणशास्त्र विद्याशाखा व कृषी विज्ञान विद्याशाखांप्रमाणे रु. 1000/-प्रतिदिन मानधन देण्यास मंजुरीस्तव सादर<br>**वि.स.ठराव**–अभ्यासकेंद्र पहाणी समिती सदस्यांना रु. 1000/-प्रतिदिन मानधन देण्यास व्यवस्थापन मंडळाच्या मंजुरीस्तव शिफारशीसह सादर<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव - वित्तसमितीने केलेल्या शिफारशीनुसार अभ्यासकेंद्र पहाणी समिती सदस्यांना रु. 1000/-प्रतिदिन मानधन देण्यास सर्वानुमते** |

| | | |
|---|---|---|
| | | **मान्यता देण्यात आली.** |
| | 11 | **वि.स.** 12.5.8 –मा.कुलगुरू प्रा.डॉ.ई. वायुनंदन यांचे वैद्यकीय कारणास्तव झालेल्या रु.6 लक्ष खर्चास मान्यता देण्याची बाब विचारार्थ<br>**टिप्पणी** - प्रा.डॉ.ई.वायुनंदन यांना पोटाचा त्रास सुरु झाल्याने तपासणी केली असता त्यांना **Hepatic Flexure Growth**या आजाराने त्रास होत असल्याने शस्त्रक्रिया, औषधोपचार, तपासण्या इ. साठी रु.6 लक्ष खर्चास मान्यता देणेबाबत प्रस्ताव सादर<br>**वि.स.ठराव** – मा.कुलगुरू प्रा.डॉ.ई. वायुनंदन यांचे वैद्यकीय उपचारासाठी होणा-या रु.6 लक्ष खर्चास व्यवस्थापन मंडळाच्या मंजुरीस्तव शिफारशीसह सादर<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव - वित्तसमितीने केलेल्या शिफारशीनुसार मा.कुलगुरू प्रा.डॉ.ई. वायुनंदन यांचे वैद्यकीय उपचारासाठी झालेल्या व यापुढे होणा-या रु.6 लक्ष खर्चास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |
| | 12 | **वि.स.** 12.5.9 –विद्यापीठाचे पदवी प्रमाणपत्र छपाई करण्यासाठी अपेक्षित खर्च 49.60 लक्ष मंजुरी देणेबाबतची बाब विचारार्थ<br>**टिप्पणी** - विद्यापीठामार्फत पदवीप्राप्त विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे छपाईचे काम भारत सरकारच्या भारत प्रतिभुती मुद्रणालय,नाशिकरोड यांचेकडून करून घेण्यास व त्यासाठी अपेक्षित रु. 49.60लक्ष खर्चास मंजुरीस्तव सादर<br>**वि.स.ठराव** - विद्यापीठाचे पदवी प्रमाणपत्रांची छपाई भारत सरकारच्या भारत प्रतिभुती मुद्रणालय,नाशिकरोड यांचेकडून करून घेण्यास व त्यासाठी अपेक्षित रु. 49.60 लक्ष खर्चास व्यवस्थापन मंडळाच्या मंजूरीस्तव शिफारशीसह सादर<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव - वित्तसमितीने केलेल्या शिफारशीनुसार विद्यापीठामार्फत पदवीप्राप्त विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे छपाईचे काम भारत सरकारच्या भारत प्रतिभुती मुद्रणालय,नाशिकरोड यांचेकडून करून घेण्यास व त्यासाठी अपेक्षित रु.49.60 लक्ष खर्चास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |
| | 167.4.2<br>आरोग्य विद्याशाखा | विद्यापीठातील नियमित कर्मचा-यांच्या ओपीडी व आयपीडी सेवा पुरविणेसाठी श्री.गुरूजी रूग्णालय, नाशिक यांना मुदतवाढ देण्याची बाब विचारार्थ<br>**टिप्पणी** - विद्यापीठातील नियमित शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी, कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांना आरोग्य विषयक सेवा देणेबाबत, श्री.गुरुजी रुग्णालय,नाशिक यांच्यासमवेत सप्टेंबर 2015 रोजी करार करण्यात आला आहे.<br>व्यवस्थापन मंडळ ठराव क्र. 164.3.13 दि.7 सप्टेंबर 2017 नुसार सदर कराराची मुदत मार्च 2018 पर्यंत वाढविण्यात आली होती. मागील सेवा व शर्तीनुसार सदर कराराची मुदत मार्च 2019 पर्यंत वाढविण्यास मान्यता द्यावी ही विनंती.<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव - विद्यापीठातील नियमित कर्मचा-यांना आयपीडी सेवा पुरविणेसाठी श्री.गुरूजी रूग्णालय, नाशिक यांच्याशी सप्टेंबर 2015 रोजी केलेल्या करारातील सेवा व शर्तीनुसार व दि.7 सप्टेंबर 2017 च्या व्यवस्थापन मंडळ बैठकीत ओपीडी सेवेचा अंर्तभाव करण्याचे ठरले त्यानुसार सदरील सेवेचा करार करण्यास व या दोन्ही सेवांची(ओपीडी व आयपीडी) मार्च 2019 पर्यंत मुदत वाढविण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |
| | 167.4.3<br>ग्रंथालय | सन 2018-19 या वर्षासाठी वाचन साहित्य खरेदीसंदर्भात ट्रेड टर्मस निश्चिती, व्यवस्थापन मंडळाच्यावतीने मान्यता देण्याची बाब विचारार्थ<br>**टिपणी** –सन 2018-19 या वर्षासाठी वाचन साहित्य खरेदीसंदर्भात ट्रेड टर्मस निश्चिती व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेसाठी सादर<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव – ग्रंथालय समिती दि. 14 ऑगस्ट 2018 च्या शिफारशीनुसार, सन 2018-19 या वर्षासाठी वाचन साहित्य खरेदीसंदर्भात ट्रेड** |

| | | |
|---|---|---|
| | | **टर्मस निश्चिती करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |
| | 167.4.4<br>सभा व दप्तर कक्ष | कै.प्रकाश फकीरराव देशमुख यांनी दि. 16.10.2017 ते 5.3.2018 या कालावधीतआंतररुग्ण घेतलेल्या उपचाराचे सादर केलेले रु.7,60,687/- तसेच दि. 16.10.2017 ते 5.3.2018 कालावधीत बाह्यरुग्ण म्हणून विविध ठिकाणी घेतलेल्या उपचाराचे सादर केलेले रु.2,30,757/- चे वैद्यकीय खर्चाचे देयक देण्याबाबतची बाब विचारार्थ<br>**टिप्पणी -** कै.प्रकाश फकीरराव देशमुख यांनी दि. 16.10.2017 ते 5.3.2018 या कालावधीत विविध रुग्णालयात आंतररुग्ण म्हणून घेतलेल्या उपचाराचे सादर केलेले पाच देयकांचे रु.7,60,687/- आहे. नियमानुसार जिल्हा शल्य चिकित्सक, नशिक यांचेकडे शासनाने मान्य केलेल्या आजारात यांच्या आजाराचा समावेश आहे किंवा नाही तसेच औषधे व उपचार हे मान्यताप्राप्त खाजगी रूग्णालयातील आहे किंवा नाही या अभिप्रायासाठी विद्यापीठाचे संदर्भ क्र. 3 अन्वये पत्र पाठविले असता संदर्भ क्र. 4 अन्वये सदर आजार हा शासननिर्णयातील आकस्मिक आजाराच्या यादीतील क्र. Part II -5 (कर्करोग) सबंधित आकस्मिक आजारात समावेश असल्याचे प्रमाणित करुन दिलेले आहे. सदर देयक शासननिर्णय सार्व.आरोग्य विभाग क्र.वैखप्र-2016/प्र.क्र.16/ 2016/राकावि -2 दिनांक 16 मार्च 2016 नुसार एकूम पाच देयकांची एकूण रक्कम रु. 3 लाखांपुढील असल्याने व्यवस्थापन मंडळाच्या मंजुरीस्तव सादर<br>तसेच दि. 16.10.2017 ते 5.3.2018 कालावधीत बाह्यरुग्ण म्हणून विविध ठिकाणी घेतलेल्या उपचाराचे सादर केलेले रु.2,30,757/- चे वैद्यकीय खर्चाचे देयक अदा करण्याबाबत व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेसाठी सादर<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव - कै.प्रकाश फकीरराव देशमुख यांनी दि.16.10.2017 ते 5.3.2018 या कालावधीतआंतररुग्ण घेतलेल्या उपचाराचे सादर केलेले रु.7,60,687/-देयक अदा करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. तसेच विद्यापीठात अद्यापपर्यंत बाह्यरुग्ण सेवेचे देयक अदा करण्यात येत नसल्याने, दि.16.10.2017 ते 5.3.2018 कालावधीत कै. प्रकाश फकीरराव देशमुख यांनी बाह्यरुग्ण म्हणून सादर केलेले, विविध ठिकाणांचे घेतलेले, उपचाराचे देयक रु.2,30,757/ बाबत जिल्हा शासकीय रुग्णालय,नाशिक यांच्याशी पत्रव्यवहार करून मार्गदर्शन घ्यावे यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |
| | 167.4.5<br>बां.समिती<br>157.3 | दि.25 सप्टेबर 2018 रोजी बांधकाम समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती शिफारशी व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेसाठी सादर<br>मालमत्ता खरेदी (Long Lease) बाबत -<br>(1) नाशिक येथील विद्यापीठ प्रांगणाच्या लगतची खाजगी मिळकतींपैकी अंदाजित 2.5 हेक्टर रिक्त जागा खरेदी करणे.<br>(2) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधीकरण (MHADA) यांचेकडील नाशिक येथील पाथर्डी भागातील इमारत खरेदी करणे.<br>(3) विभागीय केंद्र, नागपूर येथील कार्यालयीन कामाकाजासाठी नागपूर महानगरपालिका यांचेकडून दीर्घ भाडेतत्त्वावर (Long Lease) जागा खरेदी<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव - दि. 25 सप्टेबर 2018 रोजी बांधकाम समितीची बैठकीतील मालमत्ता खरेदीबाबत (Long Lease) सखोल चर्चा करण्यात आली.**<br>**(1) नाशिक येथील विद्यापीठ प्रांगणाच्या लगतची खाजगी मिळकतींपैकी अंदाजित 2.5 हेक्टर रिक्त जागा खरेदी करावी.**<br>**(2) विभागीय केंद्र, नागपूर येथील कार्यालयीन कामकाजासाठी नागपूर महानगरपालिका यांचेकडून दीर्घ भाडेतत्त्वावर (Long Lease) जागा मंजूर झाल्याबाबत महानगरपालिकेचे पत्र प्राप्त झालेले आहे.दीर्घ भाडेपट्टीची** |

| | | |
|---|---|---|
| | | **निर्धारित रक्कम रु.7,05,72,288/- व भाडेपट्टी प्रति वर्ष रु.14,11,446/- भरण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**<br>(3) **महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधीकरण (MHADA) यांचेकडील नाशिक येथील पाथर्डी भागातील इमारत खरेदी करण्यात येऊ नये असे सर्वानुमते ठरले.** |
| | 167.4.6 कृषी विज्ञान केंद्र | विद्यापीठात सेंटर फॉर इनोव्हेटीव्ह बिझिनेस इंक्युबेशन रिसर्च अँड डेव्हलपमेंट स्थापनेस धोरणात्मक निर्णय आणि मान्यता देणे. सदर प्रस्ताव व्यवस्थापन मंडळाच्या मंजुरीस्तव सादर<br>**टिप्पणी** - विद्यापीठाच्या विविध विद्याशाखा, विभाग व उपक्रमातील शैक्षणिक, तांत्रिक, व्यावसायिक शिक्षणक्रम यासाठी आणि उच्च शिक्षण घेण्यास, विद्यार्थ्यांसाठी शास्त्रीय,संशोधनात्मक काम, तसेच विकसन काम करणे,यास्तव कुलसचिवांच्या अधिनस्त, आपल्या विद्यापीठातील सेंटर फॉर इनोव्हेटीव्ह बिझिनेस इंक्युबेशन रिसर्च अँड डेव्हलपमेंट स्थापनेस धोरणात्मक निर्णय आणि मान्यता देणे त्यासाठी सदर प्रस्ताव व्यवस्थापन मंडळाच्या मंजुरीसाठी सादर<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव - विद्यापीठात सेंटर फॉर इनोव्हेटीव्ह बिझिनेस इंक्युबेशन रिसर्च अँड डेव्हलपमेंट स्थापन करण्यास व त्यासाठीचे धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी मा.कुलगुरू यांना अधिकार प्रदान करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |
| | 167.4.7 विद्याशाखा, विभाग, कक्ष, केंद्राद्वारे | विद्यापीठातील विविध विद्याशाखा, विभाग, कक्ष, केंद्राद्वारे आयोजित करण्यात येणा-या महत्वाच्या समित्यांच्या बैठकांसाठी सदस्यांना बैठक भत्ता तसेच विविध कार्यक्रमाच्यावेळी बोलविण्यात येणा-या तज्ज्ञ व्यक्तींना मानधन देण्याची बाब विचारार्थ<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव - विद्यापीठातील विविध विद्याशाखा, विभाग, कक्ष, केंद्राद्वारे आयोजित करण्यात येणा-या महत्वाच्या समित्यांच्या बैठकांसाठी सदस्यांना बैठक भत्ता तसेच विविध कार्यक्रमाच्यावेळी बोलविण्यात येणा-या तज्ज्ञ व्यक्तींना खालीलप्रमाणे मानधन अदा करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**<br>**01. व्यवस्थापन मंडळ, सदस्य रु. 5000/-**<br>**02. विद्वत परिषद, नियोजन मंडळ, वित्त समिती, सदस्य, रु. 3000/-**<br>**03. विद्याशाखा परिषद , परीक्षा मंडळ,बांधकाम समिती, सदस्य, Research Council - रु. 2000/-**<br>**04. Registrar/Finance Officer/ COE/ A grade Officer (Teaching & Non Teaching) Selection committee Member - रु. 5000/-**<br>**05. Selection committee Member (B, C & D अधिकारी व कर्मचारी), DPC,चौकशी समिती सदस्य - रु. 2000/-**<br>**तसेच विविध कार्यक्रमांच्यावेळी बोलविण्यात येणा-या तज्ज्ञ व्यक्तींना मानधन देण्याबाबत अधिकार मा.कुलगुरू यांना अधिकार प्रदान करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |
| | 167.4.8 विद्यार्थी सेवा विभाग | जनार्दन स्वामी योगाभ्यासी मंडळाचे योग पदविका (Diploma in Yoga) आणि योग प्रगत पदविका (Advance Diploma in Yoga)या शिक्षणक्रमास विद्यापीठाची मान्यता व प्रमाणपत्र देण्यास व त्या अनुषंगाने संबंधीत मंडळाशी सामंजस्य करार करण्याची बाब व्यवस्थापन मंडळाच्या विचारार्थ सादर<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव - जनार्दन स्वामी योगाभ्यासी मंडळाचे योग पदविका (Diploma in Yoga) आणि योग प्रगत पदविका (Advance Diploma in** |

| | | |
|---|---|---|
| | | **Yoga)हे शिक्षणक्रम सुरू करण्यास व त्याअनुषंगाने जनार्दन स्वामी योगाभ्यासी मंडळाशी सामंजस्य करार (MoU) करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |
| 167.5.0 | | **ऐनवेळचे विषय** |
| | 167.5.1 आस्थापना | करारावरील अधिकारी यांच्या नियुक्त्या व्यवस्थापन मंडळ सभेपुढे कार्यात्तर मान्यतेसाठी सादर<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव –विद्यापीठ परिनियम 11(2 of 1993)अन्वये मा.कुलगुरू यांनी मूल्यमापन विभागातील करारावरील संयोजक (शैक्षणिक /आयटी) (१) श्री.प्रमोद दत्तात्रय वाघ , (२) डॉ. विठ्ठल नानाभाऊ पतंगे (३) श्री विजय ज्ञानेश्वर भाकरे यांच्या एक वर्षाच्या कालावधीसाठी पूर्वीच्याच अटी व शर्तीनुसार पुर्ननियुक्ती देण्याबाबत व्यवस्थापन मंडळाच्या वतीने केलेल्या कार्यवाहीला सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |
| | 167.5.2 आस्थापना | इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ,नवी दिल्ली यांचे शैक्षणिक व प्रशासकीय करारांवरील नियुक्त्यांच्या मानधन दरांबाबत<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव - यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठासाठी शैक्षणिक व प्रशासकीय करारावरील नियुक्ती करतांना, इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ,नवी दिल्ली यांचे दि.20 मे 2014 च्या अधिसूचनेनुसार (Notification) कार्यवाही करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |
| | 167.5.3 आस्थापना | UGC,ICAR,NCTE,MCI,MHFW, AICTE, RCI या नियामक संस्थांच्या विहित निकषानुसार त्या अंतर्गत येणा-या शैक्षणिक पात्रताधारक शिक्षकांना नियुक्तीचे निकष, त्या अनुषंगाने लाभ आणि करीयर अँडव्हान्समेट योजनेअंतर्गत लाभासंदर्भात कार्यवाही करण्याची बाब विचारार्थ सादर<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव- For teachers in the (1) Faculty of Agriculture& Veterinary Science, the norms/Regulation of Indian Council of Agricultural Research (2) Faculty of Medicine, Dentistry,Nursing & AYUSH, the norms/Regulations of Ministry of Health & Family Welfare, Government of India, (3) Faculty of Education, the norms/Regulations formulated in consultations with National Council of Teacher Education(4) Faculty of Engineering & Technology, Pharmacy & Management/Bussiness Administration the norms/Regulations formulated in consultations with All India Council for Technical Education, and the qualification in the field of rehabilitation and special education at Degree, PG Diploma and Mansters level, the norms/Regulations formulated in consultations with Rehabilitations council of India त्या त्या नियामक संस्थाकडून अंतर्भूत केलेल्या आहेत त्यानुसार व UGC,Delhi यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या अधिसुचना (Notification) स्विकारण्यास व त्याआधारे महाराष्ट्र शासनाने निर्गमित केलेले शासननिर्णय स्विकारण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |
| | 167.5.4 | विद्यापीठाने प्रशासकीय व तांत्रिक पदांबाबत स्थापन केलेल्या आकृतीबंधाबाबत.<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव – व्यवस्थापन मंडळ सदस्य श्री.बाळासाहेब सानप यांनी विद्यापीठाचा आकृतीबंधाचा अहवाल व्यवस्थापन मंडळ बैठकीत ठेवण्याबाबत सुचना केली.त्या अनुषंगाने विद्यापीठाने प्रशासकीय व तांत्रिक** |

| | | |
|---|---|---|
| | | **पदांबाबत स्थापन केलेल्या आकृतीबंधाच्या दोन्ही अहवालाबाबत मा.कुलसचिव यांनी माहिती विशद केली त्यानुसार व्यवस्थापन मंडळ सदस्य डॉ.अनिल कुलकर्णी यांनी महाराष्ट्र शासनाकडे विद्यापीठाचा आकृतीबंध पाठवितांना सखोल अभ्यास करणे आवश्यक असल्याचे नमूद केले.त्यानुसार एक उपसमिती स्थापन करण्यात यावी असे सुचविले,समितीमध्ये सदस्य निवडीचे अधिकार मा.कुलगुरू यांनी प्रदान करण्यात यावे व सदरील समितीने विद्यापीठाने स्थापन केलेल्या दोन्ही अहवालांचा अभ्यास करून, त्यात नव्याने समाविष्ट करण्यात आलेली पदे व निरसित करण्यात आलेली पदे त्यासाठी लागणारी आर्थिक तरतूद व इतर बाबींचा विचार करावा असे सुचविले त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |
| | 167.5.5 | नाशिक येथील स्थानिक वृत्तपत्रात विद्यापीठाच्या विविध बातम्या प्रसिध्द करण्यात आल्या होत्या. या बातम्यांची सत्यता तपासण्यासाठी मा.कुलगुरू यांनी डॉ. संजय खडक्कार यांच्या अध्यक्षतेखाली सत्यता पडताळणी समिती नेमली होती या समितीचा अहवाल विचारार्थ सादर<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव — डॉ. संजय खडक्कार यांच्या समितीने याबाबत सखोल अहवाल सादर केल्याचे मा.कुलसचिव यांनी विशद केले.अहवालाचा अभ्यास करून कार्यवाही सुचविण्याकरिता मा.कुलगुरू यांनी एक उपसमिती तयार करून अहवाल घ्यावा यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |
| | 167.5. 6 कृषी विज्ञान केंद्र | यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या कृषी विज्ञान केंद्रातील तांत्रिक आणि शास्त्रीय पदांना करियर अँडव्हान्समेंट स्कीम लागु करणे व सदर पदांना पदोन्नती देण्यासाठी, समकक्ष समितीच्या गठणास व समितीच्या शिफारशींना मान्यता देणेबाबत<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव — यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या कृषी विज्ञान केंद्रातील तांत्रिक आणि शास्त्रीय पदांना ICAR,New Delhi प्रमाणे करियर अँडव्हान्समेंट स्कीम लागु करणे व सदर पदांना पदोन्नती देण्यासाठी, समकक्ष समितीच्या गठणास व समितीच्या शिफारशींना सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |
| 167.6.1 | | **खालील मुद्दे व्यवस्थापन मंडळ सदस्यांनी मांडले.** |
| | 167.6.1 वित्त विभाग | विद्यापीठास आयकर विभागाकडून आलेल्या नोटीसीबाबत व त्या अनुषंगाने विद्यापीठाने आजपर्यंत केलेली कार्यवाही, प्रभारी वित्त अधिकारी यांनी विस्तृतपणे मांडली, याबाबत व्यवस्थापन मंडळ सदस्य प्रा.देवयानी फरांदे व डॉ.अनिल कुलकर्णी यांनी श्री.प्रकाश पाठक,नाशिक यांचेशी चर्चा करून योग्य ते मार्गदर्शन घ्यावे व आवश्यकता वाटल्यास त्या क्षेत्रातील तज्ञ कायदेशीर अधिकारी नेमावाअसे सुचविले. याबाबत योग्य ती कार्यवाही करण्याचे अधिकार मा.कुलगुरू यांना प्रदान करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 167.6.2 आस्थापना व वित्त विभाग | **निवृत्ती वेतनाबाबत** — विद्यापीठातील निवृत्त झालेल्या अधिकारी व कर्मचारी यांना शासनाकडून निवृत्तीवेतन मिळत नाही.यासाठी विद्यापीठाने सुरूवातीला निवृत्ती योजना मिळण्यासाठी कोणकोणत्या बाबी केल्या, साधारणपणे शासनाकडे किती रक्कम वर्ग करण्यात आली, तसेच दरमहा किती रक्कम जमा करण्यात येते याचा सविस्तर तपशील तसेच विद्यापीठाची स्वत:ची निवृत्तीयोजना तयार करावयाची झाल्यास किती रक्कम ठेवावी लागेल याचा अभ्यास व त्यासाठी लागणारी रक्कम यासंदर्भात वित्त अधिकारी यांनी सविस्तर माहिती तयार करावी.पुढील व्यवस्थापन मंडळ बैठकीत सदरील माहिती सादर करावी असे व्यवस्थापन मंडळ सदस्य प्रा.देवयानी फरांदे व प्रा.कपिलकुमार यांनी सुचविले त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 167.6.3 | मुक्त विद्यापीठाचे कार्यक्षेत्र संपूर्ण महाराष्ट्रभर आहे. "ज्ञानगंगा घरोघरी" हे ब्रीदवाक्य असून |

| | | |
|---|---|---|
| | जनसंपर्क | तळागाळातील वंचितांना शिक्षणप्रवाहात आणण्यासाठी ,विद्यापीठाने विविध शिक्षणक्रम सुरु केलेले आहेत.परंतु ग्रामीण भागात अजुनही शिक्षणाचा प्रसार, मुक्त विद्यापीठाबाबत माहिती व कार्य पोहचविण्यासाठी विद्यापीठाने "Brand Ambassador" म्हणून श्री.मकरंद अनासपुरे यांचे नाव व्यवस्थापन मंडळ सदस्य प्रा.देवयानी फरांदे यांनी सुचविले. |
| | 167.6.4 | विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीमध्ये व्यवस्थापन मंडळ सदस्यांसाठी स्वतंत्र दालनाची व्यवस्था करण्यात यावी असे व्यवस्थापन मंडळ सदस्य श्री.बाळासाहेब सानप यांनी सुचविले.याबाबत योग्य ती कार्यवाही विद्यापीठाने करावी यास मान्यता देण्यात आली. |

यानंतर व्यवस्थापन मंडळ सदस्य मा.डॉ.कपिलकुमार,नवी दिल्ली यांची व्यवस्थापन मंडळ सदस्यत्वाची मुदत समाप्त झाल्यामुळे विद्यापीठाची शाल, सन्मानचिन्ह, पुस्तक व पुष्पगुच्छ देऊन निरोप देण्यात आला.

मा.कुलगुरू तथा अध्यक्ष यांच्या परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले.

s/d
**सचिव**
**व्यवस्थापन मंडळ**

s/d
**अध्यक्ष**
**व्यवस्थापन मंडळ**